Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- II FEBRUARY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना शारीरिक शिक्षण विषय शिकवितांना येणा-या अडचनीमध्ये इनडोअर सुविधांच्या उपलब्धतेचा तुलनात्मक अभ्यास

प्रा. डॉ. अजय प्र. कोलारकर
हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळ,यवतमाळ

## प्रस्तावना:

भारताची शारीरिक शिक्षणाची परंपरा प्राचीन काळापासून आहे. यशस्वी जीवन जगण्याची कला शारीरिक शिक्षण यातुनच साधता येते. रामायण व महाभारत काळामध्ये मोठ मोठे आश्रम हीच विद्यालये, महाविद्यालये होती. आश्रमामध्ये सामान्य शिक्षण चालायचे. तसेच शारीरिक शिक्षणही चालत असे. परंतु त्या काळातील शारीरिक शिक्षणाची संकल्पना थोडी वेगळी होती. त्या काळात शरीर सुदृढ, बलवान व आकर्षक बनविणे यासोबत मल्ल विद्या, घोडेस्वारी, तलवारबाजी, तिरंदाजी इत्यादी गोष्टींचा जास्त समावेश होता. हळुहळु परिस्थिती बदलत गेली. आज आधुनिक जगात तंत्रज्ञानाच्या मदतीने स्वतंत्र विभाग करुन त्यांचा अभ्यास करुन त्यावर संशोधन करुन बरीचशी माहिती प्राप्त झालेली आहे. त्याच माहितीच्या आधारे खेळ, क्रीडा व कला थोड्या फार बदललेल्या आहेत.

प्राचीन काळात सुद्धा शारीरिक शिक्षणास अतिशय महत्व होते हे आपणास माहितच आहे. त्यापुढे अनेक साम्राज्य आलीत, परकीयांचे आक्रमण आपल्या देशावर होत गेले. तशी आपल्या भारत वर्षातील आचार, विचार, नैतिक सामर्थ्याला सुद्धा भरती ओहोटी लागली. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात शारीरिक शिक्षणाचा विकास गतिमान पद्धतीने झाला होता, तीच प्रगती ब्रिटीशांच्या राजवटीत सुद्धा कायम होती. पण त्याला काही मर्यादा होत्या. कारण त्यांच्या काळात सैनिक व युद्ध यावर जास्त भर होता. तेव्हा शारीरिक शिक्षणाकडे त्यांचे लक्ष जास्त असल्याने व्यायाम, कवायत, आहार अशा अनेक गोष्टी त्यांनीच आपणास अवगत करुन दिल्या आहेत असे म्हणण्यास हरकत नाही. पाश्चिमात्य देशात या विषयास फार मोठे स्थान दिलेले आहे. कोणत्याही शिक्षण शाखेचा शास्त्रिय अभ्यास केल्याशिवाय त्या विषयाची प्रगती फारशी पद्धतशीर होत नाही. आपण खेळ या विषयात अजुनही मागे आहोत. आपल्या प्रगतीचा मार्ग अनेकवेळा चुकलेला दिसतो. म्हणून विषयाकडे शास्त्रिय व तांत्रिक दृष्टिकोणातून लक्ष देणे गरजेचे आहे.

आपण खेळाचा विकास केला पाहिजे, आपण आपला दर्जा सुधारला पाहिजे, आपण फार मोठे आहोत असे सर्वच म्हणतांना आपल्याला आढळतात. पण यात पुढाकार घेऊन त्यातून उचित मार्ग काढण्याचा प्रयत्न करतांना सहसा कोणी आढळत नाही. त्यामुळे आपण अजुनही पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत बरेच मागे आहोत असे उपलब्ध माहितीवरुन निदर्शनास येते. ही सर्व परिस्थिती बदलण्याकरिता शारीरिक शिक्षण हा विषय शिक्षणात महत्वाचा म्हणून समाविष्ट करण्यात यायला पाहिजे होता, तो आजमितीला थोड्याफार प्रमाणत समाविष्ट करण्यात येतो आहे.

## समस्येचे उद्देश:

अध्यापक विद्यालयाच्या अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षण या विषयाचा विशेष समावेश करुन त्या अनुषंगाने झालेल्या बदलामळु े शारीरिक शिक्षण शिक्षकांना शारीरिक शिक्षण हा विषय शिकवितांना उद्‌भविणाऱ्या अडचणींना पडताळून पाहण्याचा मख्ु य उद्देश होता.

अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील शारीरिक शिक्षण शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे. अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील शारीरिक शिक्षण शिक्षकांना येणाऱ्या अडचणींची तुलना करणे. ग्रामीण व शहरी विभागामध्ये असलेल्या अपूऱ्या सुविधां नसुर विषय शिकवितांना यते असलेल्या अडचणींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## परिकल्पना:

संशोधनकर्त्याने अशी परिकल्पना केली होती की,

1 अमरावती परिक्षेत्रामधील अध्यापक विद्यालयातील शारीरिक शिक्षण शिक्षकांना शारीरिक शिक्षण विषय शिकवितांना यते असलेल्या अडचणी ह्या नागपुर परिक्षेत्रातील शिक्षकांना देखील सारख्याच असतील.

2 शारीरिक शिक्षण हा विषय शिकवितांना यणे ाऱ्या अडचणी शहरी भागापेक्षा ग्रमीण भागात जास्त आढळतील.

**संशोधनाची कार्यपद्धती**

## जनसंख्या –

प्रस्ततु संशोधनाकरिता अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील कार्यरत शारीरिक शिक्षण शिक्षक हे माहीतीचे स्त्रोत बनले.

## संशोधन अभिकल्प –

प्रस्ततु संशोधनाकरिता सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

## नमूना पद्धत –

वर्तमान संशोधनासाठी अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील कार्यरत शारीरिक शिक्षण शिक्षक याचीं निवड यादृच्छिक पद्धतिने केल्या गेली.

**संशोधन कार्यवाही –**

प्रस्ततु संशोधनाच्या अध्ययनाकरीता प्रश्नावली, तसेच वयै क्तीक मलु ाखातींचा उपयोग केल्या गेला. यामध्ये अमरावती परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील कार्यरत शारीरिक शिक्षण शिक्षकांचा व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील कार्यरत शारीरिक शिक्षण शिक्षकांचा समावेश करण्यात आला याचं या तर्फे त्यांच्या विद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षणाच्या अडचणी, अडथळे, सोई-सुविधांची प्रश्नावली द्वारे माहिती गोळा करण्यात आली. खालील सारणीमध्ये असे स्पष्ट केले आहे की, अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील शिक्षकांची यादी ही त्या जिल्ह्यातील तालुका विभागात असलेल्या विद्यालयाच्या सबं धीत शिक्षकांना भेट घेउन तयार करण्यात आली आहे

**साधनांची निर्मीती**

तज्ञांच्या व मार्गदर्शकांच्या मदतीने सुरुवातीला प्राथमिक अभ्यासाकरीता प्रश्नावली तयार करण्यात आल्या होत्या. तयार केलेल्या प्रश्नावलींवर सहकारी व विशेषज्ञ यांच्याशी चर्चा करुन आवश्यक ते बदल करण्यात आले. नंतर त्याच प्रश्नावली निवडक विषयांकडे वितरीत करुन त्यांच्या प्रतिक्रिया घेण्यात आल्यात. मिळालेल्या प्रतिक्रियांची मार्गदर्शक व तंज्ञांसह चर्चा करुन प्रश्नावलीत आवश्यक तो बदल केला गेला. ज्यामध्ये शारीरिक शिक्षणा करीता सोई-सुविधा, आर्थिक मदत व इतर प्रश्नांचा समावेश करण्यात आला. ज्यामध्ये शारीरिक शिक्षणासाठी विद्यालयातील सोई-सुविधा, शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम राबवितांना येणाऱ्या अडथळे व अडचणी या संबंधीत प्रश्न उपस्थित होते. वारंवारीतेवर (Test-retest) बघता प्रश्नावलींची विश्वसनीयता (Reliability) काढण्यात आली व ती (r= .75) आढळली.

प्रश्नावली ही शारीरिक शिक्षण शिक्षक यांच्या करिता होती. ज्यामध्ये एकुण ५० प्रश्न होते. त्यापैकी पहिले चौदा प्रश्न हे शारीरिक शिक्षण शिक्षक नियुक्ती व व्यवस्थापना बाबत विचारल्या गेलेले आहेत. त्यानंतरचे काही प्रश्न विद्यालयातील मुलभूत सुविधांबद्‌दल ची माहीतीची विचारणा केलेली आहे. तसेच प्रश्नावलीत खेळाडूंच्या व विद्यार्थ्यांच्या सुविधांबाबत विचारण केलेली आहे. सत्तेचाळीसव्या प्रश्नांन्वये शारीरिक शिक्षण शिक्षक यांच्या अनुभवातून कार्यक्रम राबवण्यात येणाऱ्या अडचणींना दूर सारण्यासाठी व्यावहारीक सूचना मागविल्या होत्या.

**माहीतीचे एकत्रीकरण**

अमरावती व नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयातील कार्यरत असलेले शारीरिक शिक्षण शिक्षक यांच्याकडून प्रश्नावली भरवून घेतल्या गेल्यात. शारीरिक शिक्षण शिक्षक यांना प्रत्यक्ष भेटून आणि त्यांच्या वेळेनुसार त्यांच्या कडून प्रश्नावली भरवीण्यात आल्या. प्राप्त झालेल्या प्रश्नावलींची प्रस्तृत संशोधनात संशोधकाने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी गुणात्मक या परिक्षिकेचा वापर केल्या गेला.

**साख्यिकीय कार्य पद्धती –**

संख्यिकीय विश्लेशणासाठी संशोधकाने निरीक्षणे आणि प्रतिसादाचे वर्णन करणारी टककेवारी (Percentage) आणि Chi-Square पद्धत वापरली आहे.

**सारणी क्र. ४.३८**

**अमरावती आणि नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयात इनडोअर खेळांकरिता मूलभूत सुविधांसह प्रमाणीत हॉल उपलब्ध असल्याची टक्केवारी व काय-स्क्वेअर नुसार मूल्ये दर्शवणारी सारणी**

| परिक्षेत्र | होय | टक्केवारी | नाही | टक्केवारी | Chi Square ($\chi^2$) |
|---|---|---|---|---|---|
| **अमरावती क्षेत्र** | 7 | 25.00% | 21 | 75.00% | **7.000*** |
| **नागपूर क्षेत्र** | 7 | 25.00% | 21 | 75.00% | **7.000*** |
| **अमरावती शहरी** | 4 | 28.57% | 10 | 71.43% | **2.571@** |
| **नागपूर शहरी** | 5 | 35.71% | 9 | 64.29% | **1.143@** |
| **अमरावती ग्रामीण** | 3 | 21.43% | 11 | 78.57% | **4.571*** |
| **नागपूर ग्रामीण** | 2 | 14.29% | 12 | 85.71% | **7.143*** |
| **शहरी क्षेत्र** | 9 | 32.14% | 19 | 67.86% | **3.571@** |
| **ग्रामीण क्षेत्र** | **5** | **17.86%** | **23** | **82.14%** | **11.571*** |

*सार्थक स्तर व @असार्थक स्तर

Tab $\chi^2_{0.05(1)} = 3.841$


उपरोक्त सारणी क्र.४.३८ प्रकट करते की, अमरावती व नागपूर परिक्षेत्रांची ($\chi^2$) प्राप्त मूल्ये ७.००० आहेत. तसेच दोन्ही परिक्षेत्रातील दोन्ही शहरी क्षेत्राची ($\chi^2$) प्राप्त मूल्ये अनुक्रमे २.५७१ व १.१४३ आहेत. त्याचप्रमाणे दोन्ही परिक्षेत्रातील दोन्ही ग्रामीण क्षेत्राची ($\chi^2$) प्राप्त मूल्ये अनुक्रमे ४.५७१ व ७.१४३ आहेत. अमरावती व नागपूर शहरी क्षेत्र सोडले तर इतर सर्व मूल्ये सारणीबद्ध-मूल्य (1) सार्थकता स्तर 0.05 चे मूल्य (३.८४१) पेक्षा जास्त आहे. अर्थात, इतर प्राप्त-मूल्ये सारणीबद्ध-मूल्य (1) सार्थकता स्तर 0.05 वर जास्त असल्याने नकारात्मक सार्थकतेची बाब निदर्शनास आणून देते.

तसेच अमरावती-नागपूर शहरी क्षेत्राचे $\chi^2$ प्राप्त मूल्य ३.५७१ ही सारणीबद्ध-मूल्य (1) सार्थकता स्तर 0.05 चे मूल्य (३.८४१) पेक्षा कमी आहे. आणि अमरावती-नागपूर ग्रामिण क्षेत्राचे $\chi^2$ प्राप्त मूल्य ११.५७१ हे सारणीबद्ध-मूल्य (1) सार्थकता स्तर 0.05 चे मूल्य (३.८४१) पेक्षा जास्त आहे. शहरी व ग्रामिण परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयात इनडोअर खेळांकरिता मूलभूत सुविधांसह प्रमाणीत हॉलची उपलब्धता खूपच कमी आहेत. तसेच शहरी क्षेत्रापेक्षा ग्रामिण क्षेत्रातील अध्यापक विद्यालयात इनडोअर खेळांकरिता मूलभूत सुविधांसह प्रमाणीत हॉलची उपलब्धता फारच कमी असल्याने नकारात्मक सार्थकता आढळली.

दोन्ही परिक्षेत्राची ($\chi^2$) मूल्यावर तुलना केल्याने असे आढळून आले की, दोन्ही परिक्षेत्रात इनडोअर खेळां करिता मूलभूत सुविधांसह प्रमाणीत हॉल उपलब्धतेच्या प्रमाणाबाबत आणि अनुशंगाने त्यांच्या अडचणींत साम्यता आढळते. तेव्हा, पहिली परिकल्पना सिद्ध होते.

परंतु, ग्रामीण व शहरी क्षेत्राची ($\chi^2$) मूल्यावर तुलना केल्याने असे दिसून आले की, शहरी क्षेत्रापेक्षा ग्रामीण क्षेत्रातील अध्यापक विद्यालयात इनडोअर खेळां करिता मूलभूत सुविधांसह प्रमाणीत हॉल उपलब्धतेचे प्रमाणात तफावत आढळते. तेव्हा, दुसरी परिकल्पना देखील सिद्ध होते.

अध्यापक विद्यालयात इनडोअर-खेळांकरिता मूलभूत सुविधांसह प्रमाणीत हॉल उपलब्धतेची टक्केवारी जी सारणी क्र.४.३८ मध्ये दर्शविल्या गेली आहे ते, आलेख क्र.३६ मध्ये देखील ग्राफिकदृ ट्या चित्रित केले आहे. त्यास खाली दिले आहे.




**आलेख क्र.३६:** अमरावती आणि नागपूर परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयात इनडोअर-खेळांकरिता मूलभूत सुविधांसह प्रमाणीत हॉल उपलब्ध असल्याची तुलनात्मक टक्केवारी दर्शविणारा आलेख.

**निष्कर्ष:**

शहरी व ग्रामिण परिक्षेत्रातील अध्यापक विद्यालयात इनडोअर खेळांकरिता मूलभूत सुविधांसह प्रमाणीत हॉलची उपलब्धता खूपच कमी आहे. तसेच शहरी क्षेत्रापेक्षा ग्रामिण क्षेत्रातील अध्यापक विद्यालयात इनडोअर खेळांकरिता मूलभूत

सुविधांसह प्रमाणीत हॉलची उपलब्धता फारच कमी असल्याचे आढळले.

**संदर्भ ग्रंथ सुची**


1. Ismael Sood Al-Oun, Muder Qahtan Hameed, Al- Leheeby, "Obstacles facing the implementation of physical education curriculum in Iraqi Public Schools as perceived by Teachers in Anbar Governorate", European Scientific Journal, Vol.11, No.16, (June 2015 edition), ISSN: 1857 – 7881
2. सच्चिदानंद भिका जाधव, "अखिल भारतीय आतं र विद्यापीठ स्तरीय स्पर्धेतील कुस्ती खेळाडू आणि विद्यापीठाच्या सहभागाचा व प्राविण्याचा विश्लेषणात्मक अभ्यास", (अप्रकाशित संशोधन प्रबंध, पणु े विद्यापीठ २००८).
3. Nate McCaughtry, Sara Barnard, Jeffrey Martin and Pamela Hodges Kulinna, "Teachers' perspectives on the challenges of teaching physical education in urban schools: The student emotional filter", Research quarterly for exercise and sport, Vol. 77, No. 4, (January 2007), pp. 486-497
4. अनिल फेडं र, "संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अभियांत्रिकी महाविद्यालयात शारीरिक शिक्षण कार्यक्रम राबवितानं ा येणाऱ्या अडचणींचे अध्ययन", (अप्रकाशित लघुशोध प्रबंध, संत गाडगे बाबा अमरावती तत्वज्ञान पारंगत पदवि करिता सादर, २००८).
5. Cariaga, Jane N. "The Physical Education Program of State Universities in Isabela", An Assessment Research Journal of Physical Education Sciences, Vol. 2(10), 1-8, October (2014).
6. Praveen Kumar et al., "Present status of infrastructure facility and sports policy in Sikh charitable schools in promotion of sports", International Journal of Physical Education, Health and Social Science, ISSN: 2278-716X, Vol. 3, Issue 2, July, 2014.
7. Xihe Zhu, Catherine D. Ennis & Ang Chen, "Implementation challenges for a constructivist physical education curriculum", Journal of Physical Education and Sport Pedagogy, Vol. 16, Issue 1, (2011) , pp.1531-1536.
8. Kate Jenkinson and Amanda C Benson, "Barriers to providing physical education and physical activity in Victorian State secondary schools", **Article** in Australian Journal of Teacher Education, Vol. 35, Issue 8, (Dec 2010).